# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यात अधिवक्ता व वकील यांच्या संरक्षणासाठी विशेष कायदा करण्याबाबत

**(१) ४१ (२१-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी (जि.अहिल्यानगर) येथील ॲड.राजाराम आढाव यांची त्यांच्या पत्नीसह माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यासुमारास अशिलाने हत्या केल्यानंतर लोकप्रतिनिधी व विविध संघटनांनी शासनाकडे वकिलांच्या संरक्षणासाठी विशेष कायदा करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वेगवेगळया मा.न्यायालयामध्ये काम करणाऱ्या वकील व अधिवक्ता यांच्यावर होणाऱ्या हल्ल्यांमध्ये वाढ झाल्यामुळे त्यांच्या संरक्षणासाठी विशेष कायदा करण्याची मागणी शासनाकडे वकील व अधिवक्ता यांच्या संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वकील व अधिवक्ता यांच्या संरक्षणासाठी विशेष कायदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-०५-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, बार कॉन्सिल ऑफ इंडियाने ''ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट'' तयार करणे संदर्भात एक समिती गठित केली असून, सदर समितीने वकिलांची शारीरिक सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता, तसेच त्यांचे बेकायदेशीर अटकेपासून संरक्षण, इ. बाबींचा सर्वंकष विचार करुन, त्याअनुषंगाने विधेयकाचे प्रारूप तयार केले आहे, जेणेकरून देशातील वकील त्यांची कर्तव्ये निर्भयपणे पार पाडू शकतील.

तसेच, बार कॉन्सिल ऑफ इंडिया कडून ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट पारित करणे संदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तरी, वकिलांच्या संरक्षणासंदर्भात, देशातील कायद्यात एकसमानता राखण्याच्या हेतूने सदर कायदा केंद्र शासनाकडून पारित होणे गरजेचे आहे.

---

## तुळजापुर (जि.धाराशिव) येथील श्री तुळजाभवानी देवी मंदिर गाभाऱ्यातील तीन शिळांना भेगा पडल्या असल्याबाबत

**(२) ३२९ (२३-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापुर (जि.धाराशिव) येथील श्री तुळजाभवानी देवी मंदिर गाभाऱ्यातील तीन शिळांना भेगा पडल्या असल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांनी मंदिराच्या केलेल्या पाहणीमध्ये काय दिसून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर कामाचे पुरातत्व विभागाने संरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) केले असून या अहवालामध्ये काय आढळून आले व त्यानुषंगाने या प्राचीन मंदिराच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून कोणती तातडीची कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

दिनांक ०७/०१/२०२५ रोजी मा.जिल्हाधिकारी, धाराशिव तथा अध्यक्ष, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांनी सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्या समवेत केलेल्या पहाणीमध्ये गर्भगृहावरील कर्णशिळा तसेच बीमला तडे गेल्याचे प्रथम दर्शनी दिसून आले. याबाबत पुरातत्व विभागाकडून Monitoring Glass व्दारे चाचणी तसेच Structural Audit करण्यात आले आहे.

(३) सदरील कामासाठी पुरातत्व विभागाकडून नियुक्त असलेल्या वास्तुविशारद मे. तेजस्विनी आफळे असोसिएटस्, पुणे यांच्याकडून Structural consultant Shashank Mehendale and Associates, Mumbai या संस्थेमार्फत संपूर्ण मुख्य मंदिराचा संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यात आले असून त्यांनी दिनांक २४/०२/२०२५ रोजी अहवाल सादर केला आहे. त्यातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

Mukhya Garbh Gruh-

Major cracks have been observed in the Karna Sheela stone members of the Mukhya Garbh Gruh. It is recommended to monitor these cracks further to determine if they are active.

The walls of the Mukhya Garbha Gruh can be retained.

Identified cracks can be repaired, and stone members can be Structurally strengthened using stone stitching technology.

Considering past modifications, repairs, and higher seismic zone and within ८० km of killari fault zone, in-situ repairs cannot be recommended at this stage. A detailed study is required to assess which parts can be repaired and reconstructed.

If necessary to check whether, stones above cracked stone are intact.

If the decision is made to remove the shikhar for restoration based on archival evidence, the Karna Sheela can also be removed and replaced to maintain consistent method of construction and to maintain adequate bearing.

Antaral -

Major cracks have been observed in the Karna Sheela stone members of the Antaral part of the temple.

The roof of the Antaral contains non-symmetrical structural elements, with irregularly shaped stone components creating gaps and loss of pointing material.

An opening in the roof for ventilation has been observed.

It is recommended to carefully remove and reconstruct the roof of the Antaral using original materials and in accordance with archival drawings and archaeological norms.

Since, dismantling of the roof cannot be done with shikhar in place, Shikhar or part there of may have to be dismantled and preserved as per archeological norms and reconstructed after the roof is done.

Sinhacha Gabhara -

The Sinhacha Gabhara roof was constructed using the Kapcha Dome Style method, with three openings (१८” x १८”) created for air conditioning ducts.

Stone elements around the openings appear loose.

Joints of the dome stones are opening.

It is recommended to carefully remove and reconstruct the roof of the Sinhacha Gabhara using original materials, following archival drawings and archaeological norms.

Bhavani Shankar Mandap -

The Sabha Mandap is supported by stone columns and stone beams, with stone slabs resting on the beams. Structural distress has been observed in the columns and beams.

Partial settlement is visible in some column capitals and beams, identified by gaps in floor stones and beams.

It is recommended to carefully remove and reconstruct the roof of the Bhavani Shankar Mandap using original materials and in accordance with archival drawings and archaeological norms.

Bhavani Shankar Mandir -

No major structural distress has been observed in this part of the temple. General repairs, as recommended by conservation architects, should be carried out.

वरील संरचनात्मक लेखापरिक्षण अहवाल यातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे असून यामध्ये मंदिराच्या बांधकामात वारंवार बदल केल्यामुळे मंदिराच्या संरचनेत बदल झालेला आहे. मंदिराच्या शिखराचा अतिरिक्त भार झाल्याचे दिसून येते. अहवालानुसार पुरातत्व विभागाकडून तज्ञांचे मार्गदर्शन घेऊन गर्भगृहाचे व शिखराचे बळकटीकरणाचे काम प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच Inotech India Private Limited, Pune या संस्थेमार्फत दिनांक १२/०२/२०२५ रोजी मंदिराची Radiography करण्यात आली आहे. याचा रिपोर्ट दिनांक २४/०२/२०२५ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर रिपोर्टमध्ये अंतिम पुढीलप्रमाणे निष्कर्ष आहेत. यामध्ये अनेक ठिकाणी बॉंडिंग मटेरिअलचे नुकसान दिसून आले आहे व काही ठिकाणी भिंतीच्या विटांमध्ये झीज आढळली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी धाराशिव तथा अध्यक्ष श्री.तु.भ.मं.सं.तु यांच्या मार्फत दिनांक २५/०२/२०२५ रोजी सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना पत्रव्यवहार करुन उपरोक्त रिपोर्टचे अवलोकन करुन आवश्यकता असल्यास तज्ञ व्यक्तींचे अभिप्राय घेऊन श्री देविजींच्या मुख्य शिखराचे व गाभाऱ्याचे कामाबाबत पुढील निर्णय घेऊन या कार्यालयास कळवावे असे कळविण्यात आले होते. मंदिराच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून तातडीची कार्यवाही म्हणून तडा गेलेल्या भागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात कोणत्याही प्रकारची क्षती होऊ नये म्हणून जॅकद्वारे लोखंडी रॉडचा टेकू देण्यात आलेला आहे.

(४) पुरातत्व विभागाकडून प्राचीन मंदिराच्या सुरक्षिततेसाठी भारतीय पुरातत्व खात्यासोबत समन्वय साधून मंदिराच्या सुरक्षेच्या दृष्टीने तातडीची कार्यवाही करणे प्रगतीपथावर आहे.

---

## नाशिकच्या पालखेड डावा कालव्याचे आधुनिकीकरण करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत

**(३) ३६१ (१७-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालखेड (ता.दिंडोरी, जि.नाशिक) डावा कालवा प्रकल्पाकरीता केंद्र शासनाच्या सिम्प या कार्यक्रमांतर्गत टप्पा ४ अंतर्गत निधी मिळण्यासाठी जलसंपदा विभागाने दिनांक ९ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांच्याकडून शेरेपूर्तता अहवाल मागविलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिम्प (SIMP System Improvement Modernisation programme) या योजनेंतर्गत एशियन डेव्हलपमेंट बँकेमार्फत नाशिक पालखेड डावा कालव्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी प्रिलिमिनरी प्रोजेक्ट रिपोर्टला शासनाची मान्यता मिळण्यासाठी दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ) यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिकच्या पालखेड डावा कालव्याचे ADB च्या सहाय्याने सिम्प अंतर्गत आधुनिकीकरण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (११-०६-२०२५) :** (१) व (२) होय,

(३) शासनस्तरावरून या प्रस्तावास मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिकवरुन आलेल्या पर्यटकांनी अलिबाग येथील दुकानदार व त्यांच्या मुलाला मारहाण केल्याबाबत

**(४) ६३२ (२२-०४-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकवरुन आलेल्या पर्यटकांनी चौल-भाटगल्ली,अलिबाग येथील सिमेंट व अन्य मटेरियल सप्लायर्सचे दुकानदार व त्यांचा मुलगा यांना सागमळा एस नाईक आळी (अलिबाग) येथे अरेरावीची भाषा केल्याची घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पर्यटकांकडून सिमेंट व अन्य मटेरियल सप्लायर्सचे दुकानदार व त्यांचा मुलगा यांना मारहाण देखील केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात सिमेंट व अन्य मटेरियल सप्लायर्सचे दुकानदार व त्यांचा मुलगा यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात गेले असता पोलीस ठाण्यात पर्यटकांना पिझ्झा बर्गर मागवत त्यांचा पाहुणचार करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रेवदंडा पोलिसांनी श्री अरुण घरत व त्यांचा मुलगा सुयोग घरत यांची जवळजवळ आठ तासानंतर रात्री उशिरा तक्रार घेऊन गुन्हा दाखल केला असून सदर प्रकरणाची तक्रार नोंदवून घेण्यास विलंब केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने नाशिक येथील पर्यटकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०२५) :** (१) व (२) दिनांक ०६/०१/२०२५ रोजी रेवदंडा अलिबाग रोडवर येसनाईक आळी चौल येथे स्थानिक रहिवाशाच्या चारचाकी वाहनास ओव्हर टेक करताना झालेल्या अपघातामुळे पर्यटकांकडून नुकसान भरपाई मागण्याच्या विषयावरुन घटनास्थळी पर्यटक व स्थानिक रहिवाशी यांच्यामध्ये भांडण होऊन परस्परांना मारहाण करण्यात आलेली आहे. याबाबत स्थानिक रहिवाशी तसेच पर्यटक यांच्याकडून देण्यात आलेल्या तक्रारीनुसार परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(३) हे खरे नाही.गुन्ह्यातील पर्यटकांमधील लहान मुले सदर अपघात व मारहाणीच्या घटनेमुळे दिवसभर उपाशी राहिल्याने व रडत असल्याने त्यांच्या नातेवाईकांनीच त्यांना वडापाव खाण्यास दिला होता.

(४) सदर गुन्ह्याच्या घटनेमधील ग्रामस्थ व पर्यटक परस्पर विरोधी तक्रार दाखल करण्यास आले असता, पर्यटक गटाची तक्रार न नोंदविता स्थानिक गटाची तक्रार नोंदविण्यात यावी या मागणीकरीता स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने पोलीस ठाणे आवारात जमा झाले होते. कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न लक्षात घेता ग्रामस्थांची समजूत काढून जमाव पोलीस ठाण्यातून निघून गेल्यावर दोन्ही गटांकडे विचारपूस

करुन परस्पर विरोधी गुन्हे नोंदविण्यास विलंब झाला.
(५) स्थानिकांकडून देण्यात आलेल्या तक्रारीनुसार ९ पर्यटक यांचेविरुध्द रेवदंडा पोलीस ठाणे गु.र.नं.०४/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १९०, १९१, ११५ (२), ३५१ (२), ३५२, ३२४ (४)(५) अन्वये त्याचप्रमाणे पर्यटकांच्या तक्रारीनुसार त्याच पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं.०५/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १९०, १९१, ११५ (२), ३५१ (२), ३५२, ३२४ (४)(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर दोन्ही गुन्ह्यांचा तपास पूर्ण झाला असून गुन्ह्यातील सर्व आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घाटी रुग्णालय (जि.छत्रपती संभाजीनगर) येथे रुग्णांना देण्यात येणाऱ्या आहार वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) ७०४ (२४-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटी रुग्णालय (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील रुग्णांना दूध, अंडी, केळी, मोसंबी इत्यादीचे वाटप होत नसून फक्त त्याची कागदोपत्री नोंद केली जात असल्याने आहार वाटपात लाखो रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन दोषी असणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-०६-२०२५) :** (१) नाही.
(२) रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक चौकशी केली असता त्यात काहीही तथ्य आढळले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## काजू लघु उद्योजकांच्या व्यवसायासाठी असलेल्या जाचक अटी शिथील करण्याबाबत

**(६) ९३३ (११-०२-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात काजू पीक प्रक्रियेतील मोठ्या व छोट्या उद्योजकांना व्यवसायासाठी समान अटी व शर्ती लागू असून लहान उद्योगांसाठी सदर अटी जाचक असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काजूच्या व्यवसायासाठी मोठे उद्योजक आयबीआर बॉयलर व लघू उद्योजक बेबी बॉयलर वापरत असूनही सदर अटी दोघांनाही समान आहेत तसेच मोठ्या उद्योजकांना सहा महिन्यांमध्ये अन्न

आणि प्रशासन विभागाचा ऑटो टेस्टींग रिपोर्ट सादर करावा लागत असून लघू उद्योजकांनाही सदर रिपोर्ट गरजेचा नसतानाही सादर करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लघू उद्योजकांसाठी प्रोसेस लिमिट सेट करण्यात येऊन व्यवसायासाठी असलेल्या जाचक अटी व शर्ती शिथील करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०७-०३-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) बाष्पके अधिनियम १९२३ नुसार जे बाष्पक सदर अधिनियमाच्या "बॉयलर" या व्याख्येत बसतात अशा सर्व बाष्पकांची नोंदणी व प्रमाणपत्र नूतनीकरण सदर अधिनियमाद्वारे व त्याअंतर्गत असलेल्या भारतीय बाष्पके विनियम १९५० नुसार केले जाते. सदर अधिनियमानुसार जे बाष्पक "बॉयलर" या व्याख्येत बसत नाही, अशा सर्व बाष्पकांना सर्वसाधारण परिचीत भाषेत "बेबी बॉयलर" संबोधले जाते व अशा सर्व बाष्पकांना बाष्पके अधिनियम व भारतीय बाष्पके विनियमानुसार नोंदणी किंवा वार्षिक प्रमाणपत्र नूतनीकरणाची आवश्यकता नसते. अशा सर्व बेबी बाष्पकांना नोंदणी व प्रमाणपत्र नूतनीकरणातून सूट देण्यात येते. तसेच सदर बेबी बाष्पक चालविण्यासाठी प्रमाणित बाष्पक परिचर (बॉयलर अटेंडन्ट) ठेवण्यापासून देखील सूट देण्यात येते.

अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत अन्न व्यवसायिकांकडून ऑटो टेस्टिंग रिपोर्ट असा कोणताही अहवाल मागविला जात नाही. तथापि, परवान्यासाठी अर्ज करणाऱ्या सर्व अन्न व्यवसायिकांनी पाळावयाचे स्वच्छतेबाबतचे नियम दिनांक ११/५/२०२३ पासून कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यानुसार परवाना धारक आस्थापनेत वापरण्यात येणारे पाणी बी.आय.एस. स्टॅंडर्स ऑन ड्रिंकिंग वॉटर (आयएस १०५००) च्या मानकानुसार असल्याबाबत सहा महिन्यातून एकदा विश्लेषण करणे आवश्यक आहे.
(३) अन्न सुरक्षा व मानके अधिनियम,२००६ हा केंद्रीय कायदा असून, प्रशासनामार्फत सदर कायद्याची अंमलबजावणी राज्यात केली जाते. सदर कायद्यातील नियम व नियमने यामध्ये बदल करण्याचे अधिकार फक्त केंद्र शासनास आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नायगांव (ता.खंडाळा,जि.सातारा) येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(७) ११०४ (२३-०४-२०२५) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगांव (ता.खंडाळा,जि.सातारा) येथे दहा एकर क्षेत्रात १०० कोटी रुपये खर्चून सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी नायगांव येथे घोषणा केली असून यासंदर्भात जिल्हाधिकारी, सातारा यांनी कार्यवाही करुन दहा एकर जमिनीच्या अधिग्रहणाची प्रक्रिया सुरु करुन त्याबाबतचे आराखडे तयार करावेत असेही मा.मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१०-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामविकास विभागाच्या दिनांक १३/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक बांधकाम आराखड्याकरीता (भूसंपादनाच्या खर्चासह) एकूण अनावर्ती खर्च म्हणून रुपये १४२.६० कोटी व महिला प्रशिक्षण केंद्र दीर्घ कालीवधीसाठी कार्यान्वित करण्याकरीता अंदाजे आवर्ती खर्च म्हणून रुपये ६७.१७ लक्ष असा एकूण रुपये १४३.२७ कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय व तरतूद उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, सदर आराखड्याच्या अनुषंगाने भूसंपादनाकरीता आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, सातारा यांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांप्रमाणे अन्य समाजातील विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी शाळेमध्ये शिक्षण देण्याबाबत

**(८) १२४१ (२५-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळण्याच्यादृष्टीने जवळच्या नामांकित इंग्रजी शाळेमध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणासंदर्भात राज्यातील पिंगळा जोशी, वासुदेव, कडकलक्ष्मी, नंदीवाले, लोहार, कुंभार, चर्मकार अशा विविध समाजातील मुलांना देखील नामांकित शाळेमध्ये शिक्षण घेण्यासाठी सदर योजना अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०२-०६-२०२५) :** (१), (२) व (३) धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसंदर्भात तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे, आदिवासी विकास विभागामार्फत सुरु असलेल्या योजनांच्या धर्तीवर धनगर समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्याचा निर्णय, दिनांक ७/८/२०१९ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

त्यानुषंगाने, शासन निर्णय, दिनांक ४/९/२०१९ अन्वये धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला असून सदर योजना इतर समाजातील विद्यार्थ्यांसाठी लागू करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला नाही.

---

## गोसीखुर्द (ता.पवनी, जि.भंडारा) जलप्रकल्पांतर्गत उजव्या कालव्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(९) १२९३ (१७-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द (ता.पवनी, जि.भंडारा) जलप्रकल्प पूर्णत्वास आला असला तरीही त्याच्या उजव्या कालव्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी,२०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाणी सोडण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नागपूर येथील गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पासाठी सूरबोडी (ता.ब्रम्हपुरी,जि.चंद्रपूर) येथील शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली असून दिनांक ५ जुलै २०१३ रोजी या जमिनीच्या भरपाईचा ॲवार्ड जाहीर झाला होता, परंतु शेतकऱ्यांना अद्याप भरपाई मिळालेली नसल्यामुळे या संदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन आणि निधीची तरतूद करून या प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जमिनीचा मावेजा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पांतर्गत विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या संयुक्त उपक्रमांतर्गत नेरला उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून स्थापित पाणी कालव्याला सोडण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गोसीखुर्द धरणाचे पाणी ४० वर्षानंतर पुच्छ कालव्यात प्रवाहित झाले असताना कूपनलिका सुस्थितीत नसून भूमिगत पाईपही सुस्थितीत नसल्यामुळे शेतात पाणी न पोहोचल्याने शेतकऱ्यांची शेती कोरडी पडले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोसीखुर्द जलप्रकल्पातून उजव्या कालव्याच्या लाभार्थी शेतकऱ्यांना शेतीकरीता पाणी सोडण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१०-०६-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

गोसीखुर्द प्रकल्प हा राष्ट्रिय प्रकल्प असून, सद्य:स्थितीत बांधकामाधीन प्रकल्प असून ज्या भागात सिंचन क्षमता निर्मितीची कामे/ कालव्याची कामे पूर्ण झालेली आहेत त्या भागात खरीप सिंचनाकरीता आवर्तन देण्यात येते.

गोसीखुर्द उजवा मुख्य कालवा हा ९९.५१ कि.मी. लांबीचा असून कालव्यावरील एकूण सिंचन क्षेत्र १,०५,३२८ हे. इतके आहे. कालव्याच्या पूर्ण लांबीत कामे (६ क्रिटीकल पॅचेस व LOP वगळून) झाले असून, कालव्याद्वारे खरीप हंगामात संरक्षणात्मक सिंचनाकरीता पाणी आवर्तन सोडण्यात येते.

गोसीखुर्द उजवा मुख्य कालव्याचे क्रिटीकल पॅचेस भागात व इतर भागातील बांधकामे करावयाची

असल्याने सन २०२४-२५ चे उन्हाळी हंगामात उजवा मुख्य कालव्यास पाणी देण्यात येणार नसल्याबाबत लाभक्षेत्रातील सर्व पाणी वापर संस्थांना कळविण्यात आले होते. तसेच उन्हाळी हंगाम उचल पाणी परवाने त्यामुळे देण्यात आले नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) २०१३ मध्ये अंतिम निवाडा घोषित करते वेळी सदर शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला उपविभागीय अधिकारी, गोंडपिपरी यांना जलसंपदा विभागामार्फत सादर करण्यात आलेला होता.सदर प्रकरणाचे संबंधाने रिट पिटीशन क्रमांक १०४१/२०२४ अन्वये मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ, नागपूर येथे केस दाखल करण्यात आली होती. मा.उच्च न्यायालयाने सदर शेतकऱ्यांना मोबदल्यावर देय रक्कम संबंधित दिवाणी न्यायालयात जमा करणे बाबत निर्देश देण्यात आले. उपरोक्त रक्कम विभागीय कार्यालयाच्या दिनांक २९/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, गोंडपिंपरी यांना प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर काम शासनच्या निर्णयानुसार NBCC या केंद्र शासकीय यंत्रणेद्वारे करण्यात आले असून, सदर ठिकाणी पहिल्यांदाच बंद नलीका वितरण प्रणाली द्वारे सिंचन करण्यात आले. सिंचनादरम्यान कुपनलीका व भूमिगत पाईप हे काही ठिकाणी सुस्थितीत नसल्याचे निदर्शनास आले व त्यादरम्यान सदर दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत संबंधित यंत्रणेस कळविण्यात आले होते. सदर दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असून बहुतांशी शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी देण्यात आले आहे.

(६) गोसीखुर्द उजवा मुख्य कालव्याच्या कि.मी. २१, कि.मी. ३१, कि.मी. ३२, कि.मी. ३४ व कि.मी. ४३ वरील Critical Patch चे काम प्रगतीपथावर असून उर्वरित सिंचन क्षमता कामे डिसेंबर-२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील मालड (प.) येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत बांधलेल्या संक्रमण शिबिराची दुरवस्था झाल्याबाबत

**(१०) १३११ (०४-०३-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्तिक सोसायटी, काचपाडा नं. १, मालाड (प.), मुंबई येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत बांधलेल्या संक्रमण शिबिराची (ट्रान्झिट कॅम्पची) दुरवस्था झाली असून पाणीपुरवठा, शौचालय व इतर मूलभूत सोयी- सुविधांपासून तेथील रहिवाशी वंचित असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत अनेक वर्षांपासून तेथील ४५ कुटुंबे मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असून सदर संक्रमण शिबीरातील रहिवाशांचा तातडीने पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने तसेच पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाशांना तात्काळ मूलभूत सोई-सुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०३-२०२५) :** (१) हे खरे नाही.

कार्तिक सोसायटी, काचपाडा नं.१, मालाड (प.), मुंबई येथे झोपडपट्टी पुनर्वसन (एस.आर.ए.) प्रकल्पांतर्गत बांधलेल्या संक्रमण शिबीरामध्ये शौचालय व पाणी पुरवठ्याची सोय करण्यात आलेली आहे.
(२) व (३) प्रश्न उदभवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य धरणातून नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(११) १३१२ (०५-०३-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य धरणांपैकी भातसा धरण, शहापूर पिसे धरणातून आलेल्या पाण्यावर गाळण्याची प्रक्रिया (फिल्ट्रेशन) करुन नागरिकांना दिले जाणारे पाणी दूषित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडवली, भादाणे, आतकोली, आरांजोनोली या सर्व गावातील जनावरांचे मलमुत्र, शेण, अर्धवट जळालेले मृतदेह या सर्वांचे मिश्रण असलेले दूषित पाणी, पंपींग स्टेशनला पुरविले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यात दूषित पाण्याचे स्त्रोत असल्याने दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर याचा गंभीर दुष्परिणाम होत असून शुध्द पाणीपुरवठा होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०३-२०२५) :** (१) खरे नाही.

(२) खरे नाही.

(३) खरे नाही.

ठाणे महानगरपालिकेमार्फत भातसा धरणातील पिसे बंधाऱ्यातून २५० द.ल.लि प्रती दिन कच्चे पाणी उचलून या पाण्यावर ठाणे महानगरपालिकेच्या टेमघर येथील जलशुध्दीकरण केंद्रात शुध्दीकरण्याची प्रक्रिया केल्यानंतर शुध्द पाणी ठाणे महानगरपालिका हद्दीत वितरित करण्यात येते. सदर पाण्याचे नुमने दररोज तपासण्यात येतात.ठाणे शहरात दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## मुंबईतील कांदिवली येथे १४ भटक्या श्वानांचे मृतदेह गोणीमध्ये आढळल्याबाबत

**(१२) १३८८ (२४-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवलीतील साईनगर परिसरात एका नाल्यात १४ भटक्या श्वानांचे मृतदेह गोणीत भरुन फेकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कांदिवली मधील रहिवाशी आणि प्राणी प्रेमींना या श्वानांच्या शवविच्छेदन अहवालाची मागणी केली असता अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्यामुळे चौकशीला विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाचा तीव्र निषेध म्हणून रहिवाशी व प्राणी प्रेमींनी संबंधित आरोपींचा शोध घेऊन तात्काळ शिक्षा करण्याच्या मागणीसाठी मेणबत्ती पेटवून निदर्शने केली आहेत, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, निघृणपणे १४ भटक्या श्वानांची हत्या करणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मुंबईतील कांदिवली येथील साईनगर परिसरात ०५ श्वानांचे मृतदेह असल्याबाबत पोलीसांना कळविण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात पोलीसांना गोणीमध्ये भरलेले ०२ श्वानांचे मृतदेह सापडले आहेत.
(२) सदर प्रकरणी ०२ श्वानांचे शवविच्छेदन करण्यात आले असून त्यांच्या मृत्यूचे कारण न समजल्याने त्यांचा व्हिसेरा परिक्षणाकरीता रासायनिक विश्लेषक, कलीना, सांताक्रुझ (पूर्व) येथे पाठविण्यात आला असून त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी कांदिवली (पश्चिम)पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर येथे गु. र. क्र. ९७४/२४, भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम ३२५ सह प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील कलम ११ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने ०४ साक्षीदारांचा जबाब नोंदविण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपी मिळून न आल्याने सदर गुन्हा "खरा परंतु उघडकीस न आलेला" या शिर्षकाखाली मा.१७ वे न्यायालय, बोरीवली येथे सीसीक्र.२५६/एम/२५, दिनांक २४/०१/२०२५ अन्वये "अ" वर्गीकरण समरी मंजूर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोजे विल्हाळे (ता.भुसावळ) गावासाठी शुध्द पाण्याचा पुरवठा करणेबाबत

**(१३) १५९३ (०७-०३-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प दिपनगर, भुसावळ अंतर्गत निघणाऱ्या सुमारे ४०० हेक्टर वरील राखेमुळे पिण्याचे पाणी प्रभावित झाले असल्याने विल्हाळे ता.भुसावळ ह्या गावासाठी शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे संदर्भात लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०५ ऑगस्ट, २०२५ रोजी प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांचे कडे पत्रव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विल्हाळे गावासाठी शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०२५) :** (१) विल्हाळे गावासाठी शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे संदर्भात श्री.एकनाथरावजी खडसे, विधानपरिषद सदस्य, यांनी पत्रव्यवहार केलेला आहे.

विल्हाळे गावामध्ये महानिर्मितीतर्फे सुमारे १३० हेक्टर जमिनीवर बांधण्यात आलेल्या राख साठवण बंधाऱ्याच्या आजूबाजूच्या परिसरातील विहरी व बोअरवेलच्या पाण्याचे नमुने नियमित अंतराने वन व पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी प्रमाणित केलेल्या एजन्सीकडून तपासले जातात व त्यांचे प्रमाण हे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्धारीत मानकाच्या आत आहेत. त्यामुळे भूगर्भातील पाणी प्रदूषित झाले किंवा राख साठवण बंधाऱ्याच्या परिसरातील विहरींचे व पिण्याच्या पाण्याच्या योजनेचे पाणी प्रदूषित झाले आहे असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

(२) महानिर्मिती कंपनीच्या २x५०० मे.वॅ. प्रकल्पाच्या सांघिक सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत विल्हाळे गावात R.O. फिल्टर प्लांट उभारण्यात आलेला आहे. तसेच नुकतेच त्याचे नविनीकरण व दुरुस्ती १x६६० मे.वॅ. प्रकल्पाच्या सांघिक सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत पूर्ण करुन कार्यान्वित केला असून त्याची पुढील देखभाल व दुरुस्तीचे कामे महानिर्मिती कंपनीतर्फे करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अभिनेता सैफ अली खान यांच्यावरील हल्ल्याची चौकशी करण्याबाबत

**(१४) १६४१ (२४-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांद्रा (मुंबई) येथील अभिनेता सैफ अली खान यांच्यावर त्यांच्या राहत्या घरी हल्ला करुन गंभीर जखमी केल्याची बाब दिनांक १६ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पोलिसांनी तपासाअंती मोहम्मद शरीफुल शहजाद नावाच्या बांगलादेशी व्यक्तीला संशयित म्हणून अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अटक करण्यात आलेला व सीसीटीव्ही मध्ये दिसत असलेला व्यक्ती वेगळे असून दोषीचे बोटाचे ठसे जुळत नसून या प्रकरणात तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याची बदली करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरबाबत वांद्रे पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ८५/२०२५ प्रकरणी कलम ३११, ३१२, ३३१

(४), ३३१ (६), ३३१ (७) भा.न्या.सं. सह कलम ३ (ए), ६ (ए) पारपत्र (भारतात प्रवेश) अधिनियम १९५० सह परिच्छेद ३(१) परकीय नागरीक आदेश १९४८, सह कलम १४ परकीय नागरीक कायदा १९४६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी तपासाअंती पोलीसांनी आरोपी मोहम्मद शरिफुल इस्लाम सज्जाद मो. रुहुल अमिन फकीर उर्फ विजय दास यास दिनांक १९/०१/२०२५ रोजी अटक करण्यात आले आहे.
(३) आणि (४) सदर गुन्हयातील तपासी अधिकारी यांची बदली करण्यात आलेली नाही. तसेच अटक करण्यात आलेला व सीसीटीव्ही मध्ये दिसत असलेला व्यक्ती एकच असलेबाबत न्यायवैद्यक प्रयोगशाळा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अहवाल सादर केला आहे. तसेच गुन्हयाचे घटनास्थळी सदर आरोपीच्या बोटांचे ठसे जुळून आलेबाबत अंगुलीमुद्रा तज्ञ यांनी लेखी अहवाल सादर केलेला आहे.
(५) प्रश्न उद्धभवत नाही.

---

## चहाच्या कागदी कपावर बंदीचे आदेश निर्गमित करण्यास दिरंगाई केली जात असल्याबाबत

**(१५) १९२५ (०३-०३-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कॅन्सरसारख्या आजाराला कारणीभूत ठरत असलेल्या चहाच्या कागदी कपावर बंदीचे आदेश निर्गमित करण्याची मागणी परभणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी परभणी जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सहायक आयुक्त अन्न व औषधे प्रशासन, परभणी यांनी कागदी कपावर बंदी आणण्यासाठी दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी जिल्हाधिकारी, परभणी यांना निवेदन दिले असून अद्यापही याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कॅन्सरसारख्या आजाराला कारणीभूत ठरत असलेल्या चहाच्या कागदी कपावर बंदी आणण्याबाबत दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मागणी करूनही दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०३-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८, दिनांक २३ मार्च, २०१८ व सुधारित अधिसूचना दिनांक १५/०७/२०२२ नुसार राज्यामध्ये प्लास्टिक लेपित तसेच प्लास्टिक थर असणाऱ्या पेपर / ॲल्युमिनियम इ. पासून बनविलेल्या डिस्पोजेबल डिश, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटा, वाडगा, कंटेनर इ. एकल वापर उत्पादनावर बंदी घालण्यात आली आहे.

परभणी जिल्ह्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत मागील २ वर्षामध्ये ८१ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली असून, रुपये ४,२०,८००/- इतका दंड वसुल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इतर मागासवर्गासाठी असलेल्या शासकीय वसतिगृहामधील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत

**(१६) १९९३ (२३-०४-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागासवर्गासाठी असलेल्या शासकीय वसतिगृहामध्ये इयत्ता ११ वी व १२वी च्या विद्यार्थ्यांना तसेच पी.जी., पॉलिटेक्निक, एएनएमच्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश दिला जात नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कनिष्ठ महाविद्यालय, पी. जी., पॉलिटेक्निक तसेच एएनएम (Auxiliary Nurse Midwife) च्या विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीयांच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२७-०५-२०२५) :** (१) व (२)

राज्य शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, भारतीय वैद्यकीय शिक्षण परिषद / वैद्यकीय परिषद, भारतातील फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, कृषी परिषद, महाराष्ट्र तंत्र शिक्षण परिषद वा तत्सम सक्षम प्राधिकारी यांच्या मार्फत मान्यता प्राप्त महाविद्यालयामध्ये व मान्यता प्राप्त पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाचा प्रवेश देण्याचे शासनाचे धोरण आहे.

या वसतिगृहामध्ये प्रवेश हा व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश देय आहे. तसेच, ज्या पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांस पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षास प्रवेश देय आहे, त्याच पदवी अभ्यासक्रमास द्वितीय वर्षाकरीता प्रवेश देय राहील. उर्वरीत सर्व पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्ष प्रवेश देय राहील.

तथापि, वसतिगृह योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता सदरहू योजनांच्या अटी व शर्तीमध्ये आवश्यक त्या सुधारणा सूचवण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडून मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर शहरातील औरंगापुरा भाजीमंडईचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१७) २१५१ (२५-०२-२०२५) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने सन २०१२ रोजी शहरातील औरंगापुरा भाजीमंडईच्या जागेवर शॉपिंग कॉम्पलेक्स आणि तळ मजल्यावर भाजीमंडई उभारण्यासाठी बीओटी तत्वावर देण्यात आलेले काम अपूर्णावस्थेत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाजीमंडई विकसित करण्यासाठी बीओटी तत्वावर देण्यात आलेले काम १२ वर्षे होवूनही पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारावर महानगरपालिकेच्या प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने औरंगापुरा भाजीमंडई विकसित करण्याचे काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारावर व त्यास जबाबदार असलेल्या महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच औरंगापुरा भाजीमंडई सुरु करुन नवीन शॉपिंग कॉम्पलेक्स मध्ये जुने व्यापाऱ्यांना गाळे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०३-२०२५) :** (१) हे, खरे आहे.
(२) हे, खरे नाही.

महानगरपालिकेने वेळो - वेळी कंत्राटदारास सदरचे काम करण्याबाबत समज दिली आहे. बीओटी निविदेतील अटी / शर्तीनुसार सदर कंत्राटदारास दिनांक २८/०७/२०१४ पासून काम करण्यास दिरंगाईबाबत दंड आकारणी करण्याची कार्यवाही महानगरपालिकेने केली आहे.
(३) व (४) जागेच्या अडथळयांमुळे, जागेच्या पूर्वेकडे असलेले अतिक्रमण, न्यायालयीन प्रकरणे, नागरिकांचा विरोध, जागेचे प्रॉपर्टी कार्ड वर महानगरपालिकेचे नाव नसणे, कोवीड १९ प्रादुर्भाव इत्यादी कारणांमुळे सदर काम पूर्ण होण्यास विलंब झाला.

तथापि, आजमितीस बीओटी (बिल्ड ऑपरेट ट्रान्सफर) अंतर्गत कंत्राटदाराने महानगरपालिकेस द्यावयाचे बांधकामापैकी भाजी - मंडईसाठीचे गाळयांचे काम जवळपास पूर्ण झाले असून महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाचे काम सुमारे ९५% पूर्ण झालेले आहे.

बीओटी (बिल्ड ऑपरेट ट्रान्सफर) प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर जुन्या अधिकृत गाळेधारकांना महानगरपालिकेमार्फत प्राधान्याने गाळे देण्यात येणार आहेत.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील “ह” प्रभागामध्ये होत असलेल्या अनधिकृत बांधकामांबाबत

**(१८) २२२६ (०५-०३-२०२५) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील “ह” प्रभागाअंतर्गत कोपर येथील चारुबामा शाळेच्या मागील भागात कृष्णा टॉवरजवळील वनराई तोडून भूमाफियांनी बेकायदेशीररित्या सात मजल्याची इमारत बांधल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या “ह” प्रभागामध्ये कार्यरत असलेले सहाय्यक आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रातील जुन्या डोंबिवलीत श्री.प्रकाश गोठे व श्री.शंकर ठाकूर यांच्या फशी हाईटस व गटारावर बांधलेली बेकायदेशीर इमारत, ठाकूरवाडीत शाळेच्या आरक्षणावरील शिवलिला इमारत, राहूल नगर मधील रमाकांत आर्केड इमारत, सुदाम रेसिडन्सी बेकायदा इमारत, कुंभारपाडा खंडोबा मंदिरासमोरील बेकायदा इमारत

इत्यादी अनधिकृत इमारती मोठ्या प्रमाणात निर्माण होत असतानाही सहाय्यक आयुक्तांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील "ह" प्रभागामध्ये होत असलेल्या अनधिकृत बांधकामांबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या "ह" प्रभागामध्ये होणाऱ्या अनधिकृत बांधकाम निष्कासित करुन त्यास जबाबदार असलेल्या महानगरपालिकेच्या प्रभागाचे सहाय्यक आयुक्त यांना निलंबित करुन त्यांच्यावर व भुमाफियांवर गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०३-२०२५) :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील 'ह' प्रभाग क्षेत्रामध्ये चारूबामा शाळेच्या मागे, कृष्णाई बिल्डींगजवळ संपूर्ण रहिवास इमारत आढळून आली आहे, वस्तुस्थिती आहे.
(२) फशी हाईटस इमारत, शिवलिला इमारत, सुदाम रेसिडेन्सी-१ इमारत या ठिकाणी अनधिकृत बांधकाम आढळून आल्यानंतर, संबंधित बांधकामधारकास अधिकृततेबाबत कागदपत्रे सादर करण्याचे कळविले होते. परंतु, बांधकामधारकाने कोणताही प्रतिसाद न दिल्याने, संबंधितांवर गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.
रमाकांत आर्किड इमारत या ठिकाणी अनधिकृत बांधकाम आढळून आल्यानंतर सदर इमारतीस अनधिकृत घोषित करण्यात आले आहे.
तसेच, कुंभारखानपाडा, खंडोबा मंदिर समोरील इमारत ही महानगरपालिकेची अधिकृत परवानगी घेऊन बांधण्यात आलेली आहे.
(३) व (४) अशा आशयाचे निवेदन लोकप्रतिनिधी व नागरिकाकडून प्राप्त झाले, ही वस्तुस्थिती आहे.
प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने तपासणी करून नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे डिजिलॉकरमध्ये उपलब्ध करुन देणेबाबत

**(१९) १९२०८ (०४-०८-२०२३) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे डिजिलॉकरमध्ये उपलब्ध करुन देण्याची सूचना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे विद्यार्थी लॉग इन करुन एका क्लिकवर ते डिजिटल प्रमाणपत्र कुठेही आणि कधीही डाऊनलोड करु शकतील, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी केंद्रीय विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे डिजिलॉकरमध्ये उपलब्ध करुन देण्याच्या सुचनेच्या अनुषंगाने शासनाने या सूचनेवर निर्णय घेवून त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०६-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार सदर कार्यक्रमाचा आवाका वाढविण्यासाठी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना डिजी लॉकर पोर्टलवर विद्यार्थ्यांशी संबंधित मागील दहा वर्षांचा विदा (Data) अपलोड करण्याबाबत दिनांक २३/११/२०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच, तांत्रिक मदतीसाठी राज्य समन्वयकामार्फत वेळोवेळी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात प्राध्यापक भरतीसाठी १०९ महाविद्यालयांनी ५३२ पदांच्या भरतीसाठी ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा मागणी प्रस्ताव उच्च शिक्षण संचालनालयाकडे सादर केला नसल्याबाबत

**(२०) २०७७४ (०४-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात उच्च शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या खाजगी अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक भरतीला मान्यता देण्यात आली असून प्राध्यापक भरतीसाठी १०९ महाविद्यालयांनी ५३२ पदांच्या भरतीसाठी ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा मागणी प्रस्ताव उच्च शिक्षण संचालनालयाकडे सादर केला नसल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पार्श्वभूमीवर संबंधित महाविद्यालयांनी दिनांक १५ जून, २०२३ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव सादर न केल्यास ही पदे अन्य महाविद्यालयांना वर्ग करण्याबाबत शासनाला प्रस्तावित करण्यात येतील, असा इशारा उच्च शिक्षण संचालनालयाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनातर्फे सन २०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील २८८ पदांच्या भरतीसाठी मंजुरी देण्यात येत असतानाच उच्च शिक्षण संचालनालयाने अनेकदा मुदतवाढ देऊनही ना-हरकत प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव महाविद्यालयांनी सादर न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ना-हरकत प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव महाविद्यालयांनी सादर करण्याबाबत कोणती उपाययोजना /कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०६-१२-२०२३) :** (१) राज्यातील पद भरतीसाठी मान्यता दिलेल्या ९४ महाविद्यालयांनी ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचे प्रस्ताव सादर केले नसल्याची बाब निर्दशनास आली, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग दिनांक २४ जुलै, २०२३ अन्वये संधी देऊनही अनास्था दाखवलेल्या व पदभरतीबाबत ना-हरकत प्रमाणपत्राचे प्रस्ताव सादर न केलेल्या महाविद्यालयांची सहायक प्राध्यापक संवर्गातील पदे नवीन शैक्षणिक धोरणांची अंमलबाजावणी प्रभावीपणे करण्याकरीता ६६ स्वायत्त महाविद्यालयांना वाटप करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.